## <u>नियमित दिवाणी दावा १६३/२०२२ मधील निशाणी ०६ वरील आदेश</u>

## <u>जिजाबाई शंकर पगार वि. तान्हाजी दौलत पगार</u>

वादींनी प्रस्तुत नियमित दिवाणी दावा हा वडिलोपार्जित व एकत्र कुटुंबाच्या मिळकतीमधील हिस्सा, वाटप व संबंधित हक्क मिळविण्यासाठी दाखल केलेला असून, सदर अर्ज हा दाव्याच्या प्रलंबित काळात अंतरिम पोटगी / दरम्यानचे उत्पन्न मिळावे या मागणीसाठी दाखल केलेला आहे.

### <u>दावा मिळकतीचे वर्णन</u>

०२. प्रस्तुत दाव्यातील मिळकती या मौजे राजपुरपांडे, तळवाडे भामेर, वडेखुर्द व उत्राणे, ता. बागलाण, जि. नाशिक येथील कृषी जमिनी असून त्या दावा कलम क्र. १ मध्ये सविस्तर वर्णन केलेल्या आहेत. त्यामध्ये मौजे राजपुरपांडे येथील गट नं. १७६, मौजे तळवाडे भामेर येथील गट नं. २५५/१/२, गट नं. २५५/१/३ व गट नं. २५५/२/४, मौजे वडेखुर्द येथील गट नं. ७०/१ व ७०/२ तसेच मौजे उत्राणे येथील गट नं. १७७/१/अ या कृषी मिळकतींचा समावेश आहे. वादींचे म्हणणे आहे की, सदर सर्व मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या हिंदू एकत्र कुटुंबाच्या व वडिलोपार्जित स्वरूपाच्या असून त्यांचे कायदेशीर वाटप झालेले नाही. तर प्रतिवादींचे म्हणणे आहे की, सदर मिळकतींचे सन १९७० पासून वेळोवेळी वाटप होऊन संबंधित व्यक्ती स्वतंत्र ताबा व वहिवाटीत आहेत, तसेच काही मिळकती स्वकष्टार्जित / स्वसंपादित स्वरूपाच्या आहेत.

०३. वादींचे म्हणणे असे की, वादी व प्रतिवादी यांचे मूळ पुरुष दौलत बापु पगार असून त्यांना पर्वत, शंकर, देवाजी, जयराम, तान्हाजी व सुदाम अशी सहा मुले होती. त्यांपैकी जयराम दौलत पगार हेच हयात असून इतर सर्व भाऊ मयत झालेले आहेत. वादी क्र. १ ही मयत शंकर दौलत पगार यांची पत्नी असून वादी क्र. २ ही त्यांची मुलगी आहे. उर्वरित प्रतिवादी हे दौलत पगार यांच्या इतर मुलांचे वारस असल्याचे वादींचे म्हणणे आहे. वादींचे पुढील कथन असे की, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी सटाणा न्यायालयात रे.मु. नं. ९६/२०२२ हा दावा दाखल केला होता. त्या दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर वादींनी महसुली कागदपत्रे तपासली असता, प्रतिवादी व त्यांच्या पूर्वजांनी मयत शंकर दौलत पगार यांचे हक्क डावलून

महसुली नोंदीत खोट्या व बनावट नोंदी करून घेतल्याचे व काही जमिनींचे वाटप झाल्याचे दर्शविल्याचे वादींचे म्हणणे आहे. वादींच्या मते, शंकर दौलत पगार यांना कोणताही हिस्सा देण्यात आलेला नव्हता व त्यांनी अशा वाटपास कधीही संमती दिलेली नव्हती.

**०४.** वादींच्या म्हणण्यानुसार, दावा मिळकतीचे कधीही सरस–निरस मानाने कायदेशीर वाटप झालेले नाही. शंकर दौलत पगार हे अशिक्षित, अबोल व व्यवहारज्ञान नसलेले व्यक्ती असल्याने प्रतिवादींनी त्यांचा गैरफायदा घेऊन त्यांना वडिलोपार्जित मिळकतीतून वंचित ठेवले. त्यामुळे वादींना त्यांच्या कायदेशीर हिस्स्यासाठी प्रस्तुत दावा दाखल करावा लागला. वादींचे असेही म्हणणे आहे की, दावा मिळकती सध्या प्रतिवादींच्या ताब्यात असून त्यापासून प्रतिवादी मोठ्या प्रमाणात वार्षिक उत्पन्न घेत आहेत. तथापि, वादी क्र. १ हिला कोणतेही स्वतंत्र उत्पन्नाचे साधन नसून ती वयोवृद्ध असल्यामुळे मोलमजुरी करून उदरनिर्वाह करीत आहे. प्रतिवादींनी वादींना त्यांच्या कथित हिस्स्याबाबत कोणतेही उत्पन्न दिलेले नाही.त्यामुळे दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत वादींच्या उदरनिर्वाहासाठी दावा मिळकतीतून दरमहा रु. ५०,०००/– अंतरिम पोटगी / अन्नवस्त्र प्रित्यर्थ प्रतिवादींकडून संयुक्तपणे अथवा स्वतंत्रपणे मिळण्याचा आदेश द्यावा, अशी विनंती वादींनी सदर अर्जाद्वारे केलेली आहे.

**<u>प्रतिवादी नं.१, ६, १५, २०, २१ तर्फे वादीच्या दाव्यास व अंतरीम अन्नवस्त्राच्या अर्जास जबाब व कैफियत येणेप्रमाणे –</u>**

**०५.** प्रतिवादी नं.१, ६, १५, २० व २१ यांनी वादींच्या मुख्य दावा व अंतरिम अन्नवस्त्राच्या अर्जास लेखी जबाब दाखल करून वादींचे सर्व आरोप फेटाळले आहेत. प्रतिवादींचे मुख्य म्हणणे असे आहे की, दावा मिळकती पूर्वी हिंदू एकत्र कुटुंबाच्या व वडिलोपार्जित स्वरूपाच्या असल्या तरी त्यांचे सन १९७० मध्येच प्रत्यक्ष तोंडी वाटप झालेले होते. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, मूळ पुरुष दौलत बापु पगार यांनी दि. २४/०५/१९७० रोजी त्यांच्या सहाही मुलांमध्ये साक्षीदारांसमक्ष वाटणीपत्र करून प्रत्येकास स्वतंत्र हिस्सा व ताबा दिला होता. त्या वाटपानुसार वडेखुर्द येथील क्षेत्र पर्वत दौलत पगार यांना, तर तळवाडे शिवारातील क्षेत्र शंकर, देवाजी, जयराम व सुदाम यांना देण्यात आले होते. तसेच घरांचीही विभागणी करण्यात आली होती.

०६. प्रतिवादींचे पुढील म्हणणे असे की, सन १९७० मध्ये वाटप झाले त्यावेळी वादी क्र. १ हिचा विवाह शंकर दौलत पगार यांच्याशी झालेला असल्याने सदर वाटप तिच्या समक्ष झाले होते व तिला ते मान्य होते. त्यामुळे आता अनेक वर्षांनंतर वाटप नाकारता येणार नाही. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, वादी क्र. १ चे पती शंकर दौलत पगार यांनी त्यांच्या वाट्यास आलेल्या तळवाडे भामेर येथील सर्व्हे नं. ११५ मधील त्यांच्या हिस्स्याची जमीन देवाजी दौलत पगार यांना रक्कम रु. ३,०००/– मध्ये विक्री केली होती. त्याबाबत शंकर यांनी सौदापावती व हक्कसोड चिठ्ठी साक्षीदारांसमक्ष लिहून दिलेली होती. त्या व्यवहारात वादी क्र.१ हिची संमती होती व तिच्या समक्षच व्यवहार झालेला होता. त्यामुळे शंकर दौलत यांनी त्यांच्या हयातीतच त्यांचा हिस्सा हस्तांतरित केला असल्याने वादींना सदर दावा दाखल करण्याचा कोणताही अधिकार उरत नाही, असे प्रतिवादींचे म्हणणे आहे.

०७. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, मौजे उत्राणे येथील गट नं.१७७/१/अ ही जमीन तानाजी दौलत पगार यांची पत्नी चंद्रकला यांनी त्यांच्या स्वकमाई व स्त्रीधनातून सन १९७८ मध्ये खरेदी केलेली स्वकष्टार्जित मिळकत आहे. सदर जमिनीशी वादी किंवा शंकर दौलत यांचा काहीही संबंध नव्हता. पुढे त्या जमिनीवरील इतर वारसांची नावे स्वतःच्या अर्जाने कमी करण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे मौजे वडेखुर्द येथील गट नं. ७० ही पर्वत दौलत पगार यांची स्वसंपादित मिळकत असल्याचे प्रतिवादींचे म्हणणे आहे.

०८. प्रतिवादींनी असेही नमूद केले आहे की, वेळोवेळी सर्व मिळकतींचे स्वतंत्र वाटप होऊन प्रत्येक प्रतिवादी त्याच्या वाट्यास आलेली जमीन स्वतंत्र ताब्यात व वहिवाटीत उपभोगत आहे. महसुली नोंदी व फेरफार नोंदी त्या अनुषंगाने करण्यात आलेल्या आहेत. शंकर दौलत पगार यांनी त्यांच्या हयातीत कधीही कोणताही हिस्सा किंवा पुनर्वाटपाची मागणी केलेली नव्हती. प्रतिवादी नं. १ ते ५ यांनी पूर्वी दाखल केलेला रे.मु. नं. ९६/२०२२ हा दावा गैरसमजातून दाखल झाला होता. नंतर खरी परिस्थिती समजल्यानंतर तो दावा स्वखुशीने मागे घेण्यात आला. मात्र त्या घटनेचा गैरफायदा घेऊन वादींनी लालसेपोटी सदर खोटा दावा दाखल केल्याचा आरोप प्रतिवादींनी केला आहे.

**०९.** अंतरिम अन्नवस्त्राच्या मागणीबाबत प्रतिवादींचे म्हणणे असे आहे की, वादी क्र. १ ही मजुरी करून स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे. तसेच तिच्या मुलींकडूनही तिला पालनपोषण मिळू शकतो. दावा मिळकतीत तिचा कोणताही हिस्सा शिल्लक नसल्याने प्रतिवादींकडून अंतरिम अन्नवस्त्र मागण्याचा तिला कायदेशीर अथवा नैतिक अधिकार नाही. त्यामुळे वादींचा अंतरिम अन्नवस्त्राचा अर्ज फेटाळण्यात यावा, अशी प्रतिवादींची मागणी आहे. तसेच वादींनी प्रतिवादींना विनाकारण न्यायालयीन खर्चात टाकल्यामुळे त्यांच्याकडून रु. १,००,०००/– कॉम्पेन्सेटरी कॉस्ट देण्याचाही आदेश करावा, अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

**१०.** अर्जातील कथनांचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ येतात. त्यावर मी माझे निष्कर्ष कारणांसह पुढीलप्रमाणे नोंदवितो.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी मागणीप्रमाणे अंतरिम पोटगी मिळविण्यास पात्र आहेत काय? असल्यास किती? | **नकारार्थी.** |
| २. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>वादीतर्फे दाखल दस्तऐवज</u>

**११.** वादींनी अंतरिम अन्नवस्त्राच्या अर्जाच्या समर्थनार्थ दावा मिळकतीसंबंधी महसुली नोंदी व ओळखपत्रे न्यायालयासमोर दाखल केलेली आहेत. त्यामध्ये दावा मिळकतीचे विद्यमान मालकी व महसुली स्वरूप दर्शविणारे ७/१२ उतारे समाविष्ट आहेत. वादींनी मौजे राजपुरपांडे येथील गट नं. १७६, मौजे तळवाडे भामेर येथील गट नं. २५५/१/२, २५५/१/३ व २५५/२/४, मौजे वडेखुर्द येथील गट नं. ७०/१ व ७०/२ तसेच मौजे उत्राणे येथील गट नं. १७७/१/अ यांचे मूळ ७/१२ उतारे दाखल केलेले आहेत. सदर दस्तऐवजांवरून संबंधित मिळकतींच्या महसुली नोंदी, धारकांची नावे व फेरफार स्थिती प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच वादींनी विविध फेरफार नोंदींच्या झेरॉक्स प्रती दाखल केलेल्या आहेत. त्यामध्ये नोंद नं. १८२, ५३४, ६६१, १८९, १६१, २०५, ६३१, १९५ व ५२९ यांचा समावेश आहे. वादींच्या म्हणण्यानुसार, सदर फेरफार नोंदींच्या आधारे प्रतिवादींनी लबाडीने किंवा वादींचे हक्क डावलून

महसुली नोंदी करून घेतल्याचे दिसून येते. वादींनी या नोंदींवर आक्षेप घेत दावा मिळकती संयुक्त व वडिलोपार्जित असल्याचे प्रतिपादन केलेले आहे. याशिवाय वादी नं.१ व वादी नं.२ यांची ओळख व नातेसंबंध दर्शविण्यासाठी त्यांच्या आधार कार्डांच्या झेरॉक्स प्रती देखील दाखल करण्यात आलेल्या आहेत. सदर दस्तऐवजांचा अंतिम पुराव्यमूल्याचा विचार मुख्य दाव्याच्या सुनावणीवेळी केला जाणार असला तरी, सद्यस्थितीत ते केवळ प्रथमदर्शनी स्वरूपात विचारात घेण्यात येण्यास पात्र आहेत.

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.०१ व ०२ करिता :–</u>**

**१२.** प्रस्तुत अर्ज हा वादींनी नियमित दिवाणी दावा प्रलंबित असतांना दावा मिळकतीतून दरम्यानचे उत्पन्न / अंतरिम अन्नवस्त्र मिळावे या मागणीसाठी दाखल केलेला आहे. वादींचे म्हणणे असे आहे की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या हिंदू एकत्र कुटुंबाच्या व वडिलोपार्जित मिळकती असून प्रतिवादी सदर मिळकतींचा ताबा व उपभोग घेत आहेत. वादी क्र. १ या वयोवृद्ध असून त्यांना कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. त्यामुळे प्रतिवादींकडून दरमहा रु. ५०,०००/– अन्नवस्त्र प्रित्यर्थ मिळण्याची मागणी वादींनी केलेली आहे.

**१३.** दावा मिळकतीचे स्वरूप दर्शविण्यासाठी वादींनी मौजे राजपुरपांडे येथील गट नं. १७६, मौजे तळवाडे भामेर येथील गट नं. २५५/१/२, २५५/१/३ व २५५/२/४, मौजे वडेखुर्द येथील गट नं. ७०/१ व ७०/२ तसेच मौजे उत्राणे येथील गट नं. १७७/१/अ यांचे मूळ ७/१२ उतारे दाखल केलेले आहेत. सदर उताऱ्यांवरून संबंधित मिळकतींच्या महसुली नोंदी प्रथमदर्शनी दिसून येतात. तसेच वादींनी नोंद नं. १८२, ५३४, ६६१, १८९, १६१, २०५, ६३१, १९५ व ५२९ यांच्या झेरॉक्स प्रती दाखल करून प्रतिवादींनी लबाडीने फेरफार नोंदी करून घेतल्याचा आरोप केलेला आहे. वादींचे म्हणणे असे आहे की, सदर फेरफार नोंदी करतांना मयत शंकर दौलत पगार यांचे हक्क डावलण्यात आले.

**१४.** दुसरीकडे प्रतिवादींनी सदर दाव्यास व अर्जास सविस्तर प्रतिवाद करून दावा मिळकतींचे सन १९७० मध्येच प्रत्यक्ष वाटप झाल्याचे नमूद केलेले आहे. प्रतिवादींनी दि. २४/०५/१९७० रोजीचे कथित वाटणीपत्र असल्याचे नमूद करून दौलत बापु पगार यांनी त्यांच्या सहा मुलांमध्ये साक्षीदारांसमक्ष मिळकतींची विभागणी केल्याचे प्रतिपादन केलेले आहे.

प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, सदर वाटपाप्रमाणे प्रत्येकास स्वतंत्र ताबा देण्यात आला होता व त्यानंतर सर्व जण स्वतंत्रपणे वहिवाट करीत आहेत.

**१५.** प्रतिवादींनी पुढे महसुली फेरफार नोंदींवर अवलंबून राहून गट नं. २५५ मधील उपविभागणी, गट नं. १७७/१/अ मधील व्यवहार, तसेच गट नं. ७० मधील वाटप या सर्व बाबी दीर्घकाळापासून महसुली नोंदीत अस्तित्वात असल्याचे दर्शविले आहे. विशेषतः नोंद नं. १८९ अन्वये गट नं. २५५ चे विभाजन झाल्याचे दिसून येते. नोंद नं. २०५ व ६३१ वरून गट नं. ७० मधील स्वतंत्र वहिवाट दर्शविली आहे. तसेच नोंद नं. ६६१ वरून मौजे राजपुरपांडे येथील गट नं. १७६ बाबत शंकर दौलत पगार, पर्वत दौलत पगार, देवाजी दौलत पगार व तानाजी दौलत पगार यांनी त्यांच्या पुतण्यांस म्हणजे नितीन सुदाम, उमेश सुदाम, केदाबाई व अनुसयाबाई यांच्या नावे आपापसात वाटप व ताबा दिल्याप्रमाणे फेरफार नोंद करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर नोंदी दीर्घकाळ महसुली अभिलेखात अस्तित्वात असल्याचे प्रथमदर्शनी दिसते.

**१६.** तसेच प्रतिवादींनी त्यांच्या लेखी जबाबामध्ये शंकर दौलत पगार यांनी देवाजी दौलत पगार यांच्या नावे त्यांचा हिस्सा मोबदल्यात सोडल्याचा उल्लेख करून सौदापावती व दि. १५/०३/१९७६ रोजीची हक्कसोड चिठ्ठी अस्तित्वात असल्याचे कथन केलेले आहे. तथापि, सदर अर्जाच्या सुनावणीदरम्यान अशा स्वरूपाची कोणतीही मूळ अथवा प्रत दस्तऐवज न्यायालयाच्या अभिलेखावर दाखल करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर कथित सौदापावती व हक्कसोड चिठ्ठी यांचा या टप्प्यावर दस्तऐवजी पुरावा म्हणून विचार करता येत नाही. परिणामी, प्रतिवादींचा हा बचाव सध्या त्यांच्या लेखी कथनापुरताच मर्यादित राहतो.

**१७.** वादींनी अर्जामध्ये स्वतःला कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याचे नमूद केलेले आहे. तथापि, प्रतिवादींनी मौजे उत्राणे पोस्ट ऑफिसमधील राष्ट्रीय बचत योजनेंतर्गत वादी क्र. १ यांच्या नावावरील पासबुकाची प्रत दाखल केलेली आहे. सदर दस्तऐवजावरून वादी क्र. १ यांच्या नावाने काही ठेव रक्कम असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. जरी सदर ठेव रक्कम व त्यावरील उत्पन्नाचे स्वरूप सविस्तरपणे स्पष्ट झालेले नसले तरी वादी पूर्णतः उत्पन्नविहीन आहेत हा दावा प्रथमदर्शनी निर्विवाद राहात नाही. तसेच प्रतिवादींनी वादी क्र. १ ही मजुरी करीत असल्याचे नमूद केले आहे. वादींनी स्वतः दाव्यात व्यवसाय "मजुरी" असा नमूद केलेला असल्याची बाबही न्यायालयाच्या निदर्शनास येते.

**१८.** प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध दस्तऐवजांवरून दावा मिळकतींबाबत दीर्घकाळापासून स्वतंत्र महसुली नोंदी, फेरफार व स्वतंत्र वहिवाट अस्तित्वात असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

तसेच वादींचे पती शंकर दौलत पगार यांनी त्यांच्या हयातीत कथित वाटप अथवा फेरफार नोंदींविरुद्ध कोणतीही स्वतंत्र न्यायालयीन कारवाई केल्याचे प्रथमदर्शनी कोणतेही दस्तऐवज उपलब्ध नाहीत. त्यामुळे सद्यस्थितीत वादींचा हिस्सा निर्विवाद व निश्चित असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत नाही.

**१९.** त्याचप्रमाणे वादींना कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही हा दावा देखील उपलब्ध दस्तऐवजांच्या पार्श्वभूमीवर पूर्णतः निर्विवाद राहात नाही. परिणामी, प्रतिवादींकडून दरमहा रु. ५०,०००/– इतकी अंतरिम अन्नवस्त्राची रक्कम देण्यास भाग पाडण्यासाठी आवश्यक असा ठोस प्रथमदर्शनी आधार सध्या उपलब्ध नसल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रस्तुत टप्प्यावर वादींचा अंतरिम अन्नवस्त्राचा अर्ज मंजूर करणे उचित ठरणार नाही.

**आदेश**

१. अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

UDAY PRAKASH HINGMIRE
Digitally signed by UDAY PRAKASH HINGMIRE
Date: 2026.05.12 17:43:22 +0530

**दि.१२.०५.२०२६.** **( यु. पी. हिंगमिरे )**

**(सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, सटाणा.)**